महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव

**(गृह शाखा)**

आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव, ता.जि.जळगाव - 425 001

**दुरध्वनी क्रमांक** - 0257- 2220152 **ई मेल** - homebranchjalgaon@gmail.com

---

**वाचले** :- 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा,2005

2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897
3. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय ,मुंबई यांचेकडील अधिसुचना करोना2020/प्रक्र.58/आरोग्य 5 दिनांक 25 मार्च, 2020
4. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसूचना क्र डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 17 एप्रिल, 2020
5. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांचेकडील पुरवणी आदेश क्र डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 18 एप्रिल, 2020
6. या कार्यालयाचे आदेश क्रमांक दंडप्र-01/कावि/2020/156, दिनांक 19 एप्रिल, 2020
7. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 21 एप्रिल, 2020
8. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 23 एप्रिल, 2020

-----0000-----

क्र दंडप्र-01/कावि/2020/ 166 दिनांक 24 एप्रिल, 2020

## -: सुधारीत आदेश :-

ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र दिनांक 14 मार्च, 2020 अन्वये करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 हा दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3 व 4 मधील तरतूदीच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

**आणि ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद महाराष्ट्र शासन यांचेकडील सुधारीत आदेश दिनांक 23 एप्रिल, 2020 अन्वये शासनाचे दिनांक 17 एप्रिल, 2020 व दिनांक 21 एप्रिल, 2020 रोजीच्या आदेशामध्ये सुधारीत बाबींचा समावेश केलेला आहे.**

आणि ज्याअर्थी, करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा भाग म्हणून दिनांक 19 एप्रिल, 2020 रोजीच्या आदेशान्वये लॉकडाउन मधून वगळण्यात आलेल्या बाबी / घटक / आस्थापना यांचेकरीता सुचना , निर्देश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

त्याअर्थी, मी, **डॉ. अविनाश ढाकणे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव** आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन **उपोद्घातातील नमूद महाराष्ट्र शासनाकडील सुधारीत आदेश दिनांक 23 एप्रिल, 2020 अन्वये या कार्यालयाचे** उपोद्घातात **नमूद आदेश दिनांक 19 एप्रिल, 2020 मध्ये खालील बाबींचा समावेश करीत आहे.**

**ख) कृषी उत्पादन , फलोत्पादन व त्यासंबंधित सर्व उपक्रम सुरु राहतील :-**

9) आयात निर्यात सुविधा उदा. पॅक हाऊस, बि-बियाणे, फलोत्पादनाशी संबंधित तपासणी व उपचार केंद्रे सुरु राहतील.

10) बि-बियाणे, फलोत्पादनाशी संबंधित संशोधन करणा-या आस्थापना सुरु राहतील.

11) वृक्ष लागवड, मध व मधुमक्षीका पालनाशी संबंधित सर्व बाबींची राज्यांतर्गत व आंतरराज्य वाहतूक सुरु राहतील.

Scanned by CamScanner

**ज) सामाजिक क्षेत्राशी संबंधित खालील उपक्रम सुरु राहतील :-**

5) जेष्ठ नागरीकांची त्यांच्या राहत्या घरी जाऊन काळजी घेणारे व Bed side Attendants व care givers शी संबंधित सर्व घटक सुरु राहतील.

**ढ) जिवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करणेबाबत :-**

5) फुड प्रोसेसिंग युनिट्स उदा. ब्रेड फॅक्टरीज, मिल्क प्रोसेसिंग प्लान्टस, फ्लोअर मिल, दाल मिल्स व तत्सम घटक सुरु राहतील.

**ण) व्यावसायीक व खाजगी आस्थापना सुरु ठेवण्याबाबत :-**

6) इलेक्ट्रीक फॅन्स ची दुकाने सुरु राहतील.

**ध) शासकीय कार्यालये सुरु ठेवण्याबाबत :-**

5) सामाजिक वनीकरण व त्यांचेशी संबंधित सर्व कार्यालये सुरु राहतील. (Silviculture operations सहीत)

सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास सदर बाब ही भारतीय दंड संहिता, 1860 (45) चे कलम 188 नुसार शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश हा आज दिनांक 24/04/2020 रोजी माझ्या सही व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

जिल्हा दंडाधिकारी जळगांव

(डॉ. अविनाश ढाकणे)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव

**प्रत :- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगांव
2. पोलीस अधिक्षक जळगांव
3. आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव
4. उपवनसंरक्षक,जळगांव वन विभाग,जळगावं
5. उपवनसंरक्षक, यावल वन विभाग,जळगांव
6. अधिक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, जळगांव
7. उपविभागीय दंडाधिकारी सर्व
8. कार्यकारी दंडाधिकारी सर्व
9. जिल्हा पुरवठा अधिकारी, जळगांव
10. उप जिल्हाधिकारी रोहयो.जळगांव
11. जिल्हा कोषागार अधिकारी,जळगांव
12. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगांव
13. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव
14. जिल्हा शल्य चिकीत्सक, जळगांव
15. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी,जळगांव
16. मुख्याधिकारी सर्व (नगरपालिका/नगरपंचायत)
17. सहायक कामगार आयुक्त,जळगांव
18. सहायक संचालक,अन्न व प्रशासन ,जळगांव
19. जिल्हा महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र ,जळगांव
20. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,जळगांव
21. उप अभियंता, एम.आय.डी.सी.जळगांव

**प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे जिल्हयातील सर्व स्थानिक वर्तमानपत्रात विनामुल्य प्रसिध्दी देण्याबाबतची कार्यवाही करावी.

**प्रत :- जिल्हा विज्ञान व सुचना अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे jalgaon.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यबाबतची कार्यवाही करावी.

Scanned by CamScanner